अनुपस्थितीचा कालावधी मंजूर करणेबाबत.
श्रीम. रुपाली बा. भुईभार, लेखा अधिकारी.

संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-20
17 NOV 2025
प्राप्त झाले सही......................

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन आदेश:- संलेको-२०२५/प्र.क्र.११३/कोषा प्रशा-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, तिसरा मजला,
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक:- १३.११.२०२५.

संदर्भ:-

१) संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे आदेश क्र. संलेको-२०२२/स.२०२३/७२२, दिनांक ०२.०६.२०२३.
२) संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे पत्र क्र. प्रशा/०३.२०२३/संलेको-राप/२-का/अंशत: बदली-०२.०६/१०४५, दिनांक २०.०७.२०२३.
३) महाराष्ट्र राज्य बीज प्रमाणिकरण यंत्रणा, अकोला यांचे पत्र क्र.बीप्रयं / आस्था-३ / श्रीमती.भुईभार / कामु / ८०० / २०२३, दिनांक ३०.०८.२०२३.
४) वित्त विभागाचे पत्र क्र.संलेको-२०२३/प्र.क्र.१८३/कोषा प्रशा-२, दिनांक ०४.१०.२०२३.
५) संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे पत्र क्र. संलेको / प्रशा-राप / का-२ / अंशत:बदली / ज्ञापन / १३९२ / १०९१ / ४३५८, दिनांक १२.०८.२०२३.
६) श्रीम. रुपाली भुईभार, लेखाधिकारी यांचे दिनांक १०.१०.२०२३ व दिनांक १०.०२.२०२४ रोजीचे अर्ज.
७) संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे पत्र क्र. संलेको/प्रशा-राप/का-२/सर्वसाधारण बदली-२३/ज्ञापन/५७९/५२६, दिनांक ३०.०४.२०२४.
८) श्रीम. रुपाली भुईभार, लेखाधिकारी यांचे दिनांक १५.०६.२०२४ रोजीचा अर्ज.
९) संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे पत्र क्र. संलेको/प्रशा-राप/का-२/पदनिर्मिती माहिती/८७५/७९०/३३३६, दिनांक २७.०६.२०२४.
१०) जिल्हा कोषागार कार्यालय, अकोला यांचे पत्र क्र.कोषागार/अकोला/आस्था-१/कावि-१४४७/२०२४, दि.२५.०७.२०२४.
११) वित्त विभागाचे पत्र क्र.संलेको-२०२४/प्र.क्र.७५/कोषा प्रशा-२, दिनांक २२.०५.२०२४.
१२) संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे पत्र क्र.संलेको/वि.चौ/न.क्र.३१-२०२४/भुईभार/सअ.१/२०२४/३५४, दिनांक १९.०८.२०२४.
१३) श्रीम. रुपाली भुईभार यांचे निरंक रोजीचे अभिवेदन.
१४) संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे आदेश क्र. संलेको/वि.चौ/न.क्र.३१-२०२४/भुईभार/सअ.१/२०२४/४७५/४२७/परि.क्र.३९७, दिनांक १९.११.२०२४.
१५) शासन आदेश, वित्त विभाग क्र.संलेको-२०२४/प्र.क्र.१४६/कोषा. प्रशा.२, दिनांक ०६.०९.२०२४.
१६) श्रीम. रुपाली भुईभार, लेखाधिकारी यांचे दिनांक ०९.०९.२०२४ रोजीचे पत्र.
१७) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.सेनिवे १००१/१३०/सेवा-४, दिनांक ०२.०६.२००३.

## शासन आदेश

(१) श्रीम. रुपाली बाबाराव भुईभार, लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य बीज प्रमाणीकरण यंत्रणा, अकोला येथे कार्यरत असताना संचालनालयाच्या संदर्भाधिन क्र. १ येथील दिनांक ०२.०६.२०२३ रोजीच्या आदेशान्वये लेखा अधिकारी (संगणकीकरण), सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती येथे प्रशासकीय बदलीने पदस्थापना देण्यात आली.

0101/2025/2030
17.11.2025

(२) श्रीम. भुईभार यांनी उक्त पदस्थापनेऐवजी सुधारीत पदस्थापना मिळण्याबाबत संचालनालयास विनंती केली. त्यानुसार, संचालनालयाने संदर्भाधिन क्र.२ येथील पत्रान्वये श्रीम. भुईभार यांचा पदस्थापनेमध्ये अंशत: बदल करुन मिळणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला.

(३) दरम्यान, महाराष्ट्र राज्य बीज प्रमाणिकरण यंत्रणा, अकोला यांनी दिनांक ३०.०८.२०२३ रोजीच्या पत्रान्वये श्रीम. भुईभार यांना सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती या बदलीच्या ठिकाणी रुजू होण्यासाठी दिनांक ३०.०८.२०२३ (म.पू.) रोजी कार्यमुक्त करण्यात आले. मात्र, श्रीम. भुईभार बदलीच्या ठिकाणी रुजू झाल्या नाहीत व दिनांक ३०.०८.२०२३ पासून कर्तव्यावर गैरहजर राहिल्या.

(४) वित्त विभागाच्या संदर्भाधिन क्र.४ येथील दिनांक ०४.१०.२०२३ रोजीच्या पत्रान्वये श्रीम. भुईभार यांची अंशत: बदलीची विनंती अमान्य करण्यात आली व त्यांना पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ रुजू होण्यास कळविण्यात आले. त्यानुसार, संचालनालयाने दिनांक १२.१०.२०२३ रोजीच्या ज्ञापनान्वये, श्रीम. भुईभार यांना ज्ञापन मिळाल्याच्या दिनांकापासून ०७ दिवसाच्या आत पदस्थापना दिलेल्या ठिकाणी रुजू होण्यास व रुजू अहवाल सादर करण्यास कळविण्यात आले.

(५) श्रीम. भुईभार यांनी उक्त ज्ञापनाच्या अनुषंगाने कोणताही खुलासा सादर केला नाही व पदस्थापनेच्या पदावर देखिल रुजू झाल्या नाहीत. तसेच, श्रीम. भुईभार यांनी त्यांच्या दिनांक १०.१०.२०२३ आणि दिनांक १०.०२.२०२४ रोजीच्या अर्जान्वये अंशत: बदल करुन मिळण्याबाबत संचालनालयास पुनश्च विनंती केली.

(६) संचालनालयाच्या सर्वसाधारण बदली आदेशास १० महिन्यांचा कालावधी उलटून गेल्यानंतर श्रीम. भुईभार यांनी त्यांना Back pain व इतर आजारपणामुळे अमरावती येथील कार्यालयात हजर होता आले नसल्याचे व त्यासंबंधातील वैद्यकीय प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करीत असल्याबाबतचे निरंक रोजीचे पत्र संचालनालयास दिनांक १०.०४.२०२४ रोजी प्राप्त झाले.

(७) त्यास अनुसरून, संचालनालयाच्या दिनांक ३०.०४.२०२४ रोजीचे ज्ञापनान्वये श्रीम. भुईभार यांना दोन दिवसात बदलीच्या पदावर रुजू होण्याची अंतिम ताकीद देण्यात येत असल्याचे व रुजू न झाल्यास त्यांचेविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल असे कळविण्यात आले.

(८) सदर ज्ञापनास अनुसरून श्रीम. भुईभार यांचे संचालनालयास दिनांक १४.०५.२०२४ रोजी प्राप्त झालेले निरंक रोजीचे पत्रान्वये Back Pain, अस्थमा व इतर आजारपणामुळे अमरावती येथील कार्यालयात रुजू होणे शक्य नसल्याचे कळविले. मात्र, त्यांनी खाजगी रुग्णालयाची वैद्यकीय प्रमाणपत्रे सादर केली. तसेच, श्रीम. भुईभार यांनी संदर्भाधिन क्र.८ येथील दिनांक १५.०६.२०२४ रोजीच्या अर्जान्वये त्यांच्या स्वत:च्या वैद्यकीय कारणासोबत त्यांच्या मुलाच्या पायाची (Sprain Right Hip) समस्या निर्माण झाल्यामुळे त्यांच्या खात्यावर शिल्लक असलेल्या अर्जित, परिवर्तीत रजेसोबत बालसंगोपन रजा मंजूर करण्यास विनंती केली.

(९) श्रीम. भुईभार ह्या अनधिकृतपणे गैरहजर असल्याने संचालनालयाच्या दिनांक २७.०६.२०२४ रोजीच्या पत्रान्वये श्रीम. भुईभार यांना वैद्यकीय मंडळापुढे उपस्थित राहण्यास सांगून त्या कोणत्या आजारपणामुळे त्रस्त आहेत व त्या शासकीय सेवेसाठी सक्षम आहेत किंवा कसे याबाबत वैद्यकीय मंडळाचा अहवाल मागविण्यास जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, अकोला यांना कळविण्यात आले. मात्र, जिल्हा कोषागार कार्यालय, अकोला यांचेकडून वैद्यकीय मंडळाला तसे न कळविता केवळ श्रीम. भुईभार यांना कळविण्यात आले. त्यामुळे, कार्यालयाचे पत्र नसल्याने श्रीम. भुईभार यांची वैद्यकीय तपासणी झाली नाही.

(१०) वित्त विभागाच्या संदर्भाधिन क्र.११ येथील दिनांक २२.०५.२०२४ रोजीच्या पत्रान्वये पदोन्नती/बदलीच्या पदावर विहित मुदतीत हजर न झालेल्या अधिकाऱ्यांची म.ना.से. (शिस्त व अपील)

नियम, १९७९ अन्वये विभागीय चौकशी करण्याबाबत संचालनालयास कळविण्यात आले. त्यानुसार, संचालनालयाच्या दिनांक १९.०८.२०२४ रोजीच्या ज्ञापनान्वये श्रीम. भुईभार यांचेवर उक्त नियमाच्या नियम क्र.१० नुसार कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले. श्रीम. भुईभार यांनी त्यांचे अभिवेदन सादर केले.

(११) सदर प्रकरणी, म.ना.से. (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ५ (१) (चार) मधील तरतूदींनुसार, श्रीम. भुईभार यांची एक वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर परिणाम न करता रोखण्यात यावी, ही शिक्षा बजावण्यात आली.

(१२) वित्त विभागाचे दिनांक ०६.०९.२०२४ रोजीच्या आदेशान्वये श्रीम. भुईभार यांच्या यापूर्वीच्या पदस्थापनेमध्ये अंशत: बदल करून सुधारीत पदस्थापना लेखा अधिकारी, जलजीवन मिशन, जिल्हा परिषद, अकोला या पदावर देण्यात आली.

(१३) श्रीम. भुईभार यांनी दिनांक ०९.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये सुधारीत पदस्थापनेच्या ठिकाणी दिनांक ०९.०९.२०२४ (म.पू.) रोजी रुजू झाल्याचे संचालनालयास कळविले.

(१४) श्रीम. भुईभार यांना लेखाधिकारी (संगणकीकरण), सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती या बदलीच्या ठिकाणी रुजू होण्यासाठी दिनांक ३०.०८.२०२३ (म.पू.) रोजी कार्यमूक्त केल्यानंतर त्या संबंधित पदावर रुजू होणे आवश्यक होते. रुजू होण्यासंदर्भात संचालनालयाकडून वेळोवेळी सूचना देऊन देखिल त्या रुजू झाल्या नाहीत. परंतू, अंशत: बदलीने सुधारीत पदस्थापना दिल्यानंतर श्रीम. भुईभार तात्काळ रुजू झाल्या. तसेच, श्रीम. भुईभार यांची अनुपस्थिती ही समर्थनीय कारणास्तव नाही, असे शिस्तभंगविषयक कार्यवाहीअंती दिसून आलेली आहे.

यास्तव, महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१, परिशिष्ट-एक, अनु.क्र.१०, नियम क्र.६३ (६) नुसार, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील लेखाधिकारी संवर्गातील श्रीम. रुपाली भुईभार यांची दिनांक ३०.०८.२०२३ ते दिनांक ०८.०९.२०२४ पर्यंतची एकूण ३७६ दिवसांची अनुपस्थिती समर्थनीय नसल्याने त्यांची रजेशिवायची संपूर्ण अनुपस्थिती "अकार्यदिन" (Dies-non) म्हणून मंजूर करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

n(uan

**(ता. र. पवार)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,

२) महालेखापाल ½, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर,*

३) प्रधान सचिव (लेखा व कोषागारे) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,

४) श्रीम. रुपाली बा. भुईभार, लेखाधिकारी*

५) निवड नस्ती, कोषा प्रशा-२,

*(संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांचे मार्फत)